# कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लि; कोल्हापूर

१४५८ बी, जी.एन.चेंबर्स, कोळेकर तिकटी, मंगळवार पेठ, कोल्हापूर -४१६०१२
www.kopbankasso.com

## ❋ पाहिजेत - असि. क्लार्क ❋

संपूर्ण महाराष्ट्र राज्य कार्यक्षेत्र व ₹ ७४२ कोटी + व्यवसाय असलेल्या तसेच संपूर्ण Core Banking Solution व विविध डिजीटल चॅनेल वापरत असलेल्या बँकेत आपले करिअर घडवू इच्छिणाऱ्या पदवीधारकांकडून असिस्टंट क्लार्क पदाकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत.

### ❋ पात्रता ❋

१) भरती पदसंख्या - २०

२) कोणत्याही शाखेची मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी

३) MS-CIT/ समतुल्य प्रमाणपत्र अभ्यासक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक.

४) **प्राधान्य** -JAIIB/CAIIB/GDC&A उत्तीर्ण तसेच शासन मान्यता प्राप्त इतर संस्थेची (ICM,IIBF,VAMNICOM इ.) बँकिंग/सहकार/कायदेविषयक पदविका.

५) वयोमर्यादा : २२ वर्षे ते ३५ वर्षे

६) संगणकावर काम करता येणे आवश्यक तसेच संगणकावर मराठी, इंग्रजी टायपिंग येत असल्यास प्राधान्य

७) बँका/पतसंस्था किंवा इतर वित्तीय संस्थामधील कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य

८) पुणे जिल्ह्यातील उमेदवारांना प्राधान्य

९) ज्ञात भाषा- मराठी,हिंदी आणि इंग्रजी

### ❋ अर्ज करण्याची पद्धत व निवड प्रक्रीया ❋

१) उमेदवाराने प्रथम सर्व सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात व त्यानंतर ऑनलाईन अर्ज करावा.

२) महाराष्ट्र शासन सहकार पणन व वस्त्रोध्योग विभाग यांचे कडील दि.२१/०१/२०१९ दि.२९/११/२०२१, सहकार आयुक्त यांचे कडील दि.२४/०३/२०२२ व दि.१४/०६/२०२२ रोजीचे आदेशान्वये सहकारी बँकांतील नोकर भरती प्रक्रिया शासन नियुक्त संस्थेद्वारेच करणे बंधनकारक आहे.

३) त्यानुसार प्रेरणा को-ऑप बँक लि., डांगे चौक, थेरगांव, पुणे -४११०३३ या बँकेसाठी आवश्यक असलेले असि. क्लार्क पदासाठीची भरती प्रक्रिया सहकार आयुक्तांचे पॅनेल वरील कोल्हापुर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लि. कोल्हापुर यांचे मार्फत राबविली जाणार आहे.

४) मे.कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन यांचे अधिकृत संकेतस्थळ www.kopbankasso.co.in या वेबसाईटवर जावून ऑनलाईन अर्ज व परीक्षा शुल्क भरावयाचे आहे.

५) लेखी परीक्षेसाठी ₹ ६००/- + १०८/- (१८% जीएसटी) = ७०८/- या प्रमाणे परीक्षा शुल्क (विना परतीची) आकारले जाणार आहे.

६) परीक्षा ऑफलाईन पध्दतीने घेणेत येईल. परीक्षा १०० मार्कांची व बहुपर्यायी असणार आहे. पासिंगची गुणवत्ता यादी (कट ऑफ) ठरवणेत येईल व त्याप्रमाणे मुलाखतीस बोलवताना गुणनुक्रमे बोलविले जाईल. परीक्षेचे स्वरुप व अभ्यासक्रम साधारण IIBF च्या धरतीवर आधारीत आहे. परीक्षेचा नमुना पेपर सोबत जोडला आहे.

७) परीक्षेची तारीख, वेळ, ठिकाण व परीक्षेचे ब्रॉशर उमेदवारास त्याच्या मेल आयडीवर पाठविले जाईल. सबब मेल आयडी अर्जात अचूक लिहावा. सदर परीक्षेचे आयोजन कोल्हापुर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लि. कोल्हापुर यांचे मार्फत **पुणे** येथे केले जाणार आहे. परीक्षेचे स्थळ नियोजित तारखेपूर्वी उमेदवारांना कळविले जाईल.

८) तोंडी मुलाखतीचे आयोजन प्रेरणा को-ऑप बँक लि. यांचे मार्फत केले जाईल. ऑफलाईन परीक्षेतील मेरीटप्रमाणे तोंडी मुलाखतीसाठी बोलविले जाईल.

९) देय पगाराबाबतची माहिती उमेदवारांना तोंडी मुलाखतीचे वेळी बँकेकडून दिली जाईल.

१०) लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची यादी असोसिएशन व बँकेच्या वेबसाईटवर प्रसिद्ध केली जाईल.

११) मुलाखतीमध्ये योग्य ठरणाऱ्या उमेदवारांची बँकेच्या आवश्यकतेनुसार नेमणूक केली जाईल. याबाबतचे सर्व अधिकार प्रेरणा को-ऑप बॅंक्रेच्या संचालक मंडळाकडे राहतील.

१२) अर्ज करण्याची शेवटची मुदत दि. १९/०३/२०२५ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत राहील.

१३) या संदर्भात अन्य कोणत्याही खुलाशासाठी बँकेच्या कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते संध्याकाळी ५ या वेळेत असोसिएशन दुरध्वनी क्र. ०२३१-२६२७३०७/०८ किंवा बँकेचा मोबाईल क्रमांक ९०७५०२८०२२ वर संपर्क करावा.

१४) भरती प्रक्रिये संदर्भातील पुढील अपडेट मिळविणेसाठी वेळोवेळी बँकेच्या व असोसिएशनच्या वेबसाईटला भेट द्या.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**